# -: प्रेसनोट दिनांक- ०५/१२/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक साताप्पा कृष्णा चौगले, वय-३२, डाटा इंट्री ऑपरेटर (कंत्राटी), महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, पंचायत समिती राधानगरी कार्यालय, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर वर्ग-३, रा.मु.पो.पिरळ, चौगले गल्ली, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर यांनी लाच रक्कम देणेस प्रोत्साहन केलेबाबत.**

---

यातील तक्रारदार/फिर्यादी यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत त्यांचे राहते घरी जनावरांचा गोठा बांधला आहे. त्या गोठा प्रकरणासाठी शासनाकडून सबशिडी रक्कम मंजूर होवून मिळणेकरीता पंचायत समिती राधानगरी येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह अर्ज दिला आहे. त्या अर्जानुसार तक्रारदार यांना नमूद प्रकल्पातंर्गत एकुण ३५,०००/- रुपये शासनाकडून सबशिडी रक्कम मंजूर झाली आहे. त्या मंजूर रक्कमेपैकी पाहिला हप्ता ७,२१०/- रुपये तक्रारदार यांच्या बॅंक खात्यावर जमा झाले आहेत. उर्वरीत सबशिडी रक्कम अद्याप तक्रारदार यांच्या बॅंक खात्यावर जमा झालेली नाही. ती मंजुर रक्कम तक्रारदार यांच्या बॅंक खात्यावर जमा करणेसाठी पंचायत समिती राधानगरी येथील क्लार्क साताप्पा चौगुले व सुरेश कांबळे हे तक्रारदर यांच्याकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी पंचायत समिती राधानगरी येथील क्लार्क साताप्पा चौगुले व सुरेश कांबळे यांचेविरुध्द दिनांक १९/१०/२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयाकडे फोनवरुन तोंडी तक्रार दिली.

दिनांक १९/१०/२०१९ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तोंडी तक्रारी प्रमाणे पुढील सापळा कारवाईच्या अनुषंगाने दिनांक २२/१०/२०१९ रोजी तकरदार यांचे तक्रारीप्रमाणे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष पंचायत समिती राधानगरी येथील क्लार्क साताप्पा चौगुले व सुरेश कांबळे यांच्या लाच मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये क्लार्क साताप्पा चौगुले यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांनी बांधलेल्या जनावरांचा गोठ्याच्या प्रकरणासाठी शासनाकडून मिळणा-या सबशिडीचे बिल काढून देणेसाठी लाच रक्कम संबंधीत क्लार्क सुरेश कांबळे यांना देण्यास सांगून लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन केले असल्याचे पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

सदर घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने आज दिनांक ०५/१२/२०१९ रोजी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कक्ष पंचायत समिती राधानगरी, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर येथून आरोपी लोकसेवक साताप्पा कृष्णा चौगले, वय-३२, डाटा इंट्री ऑपरेटर (कंत्राटी) यांना ताब्यात घेण्यात आले असून त्याचेविरुध्द राधानगरी पोलीस ठाणे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उपआयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री. जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, सफौ.शाम बुचडे, पोना.शरद पोरे, नवनाथ कदम, चालक पोहेकॉ.गुरव, अपराध अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,**
**कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**